**रे. दि. मु.  ४५५/२०२१ मधील नि. ५५ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज, मयत प्रतिवादी क्र ८ विरुद्ध झालेला अबेटमेंटचा हुकुम रद्द होऊन मिळणेसाठी वादीने दाखल केला आहे.

२. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र ८ हे दि. ०१.०७.२०२४ रोजी मयत झालेले असुन त्यांचे वारस रेकॉर्डवरती येणे आवश्यक होते. परंतु वादी यांना वेळेत प्रतिवादीचा मृत्युचा दाखला न मिळाल्याने वकीलांशी संपर्क करुन वारस रेकॉर्डवरती घेणेसाठी अर्ज करता आला नाही. वादीचे वडील मयत झाल्याने वादी मानसिक धक्यातुन लवकर सावरला नसल्याने व मुंबईवरुन अन्य कामाबरोबरच वेळेत दाव्याकडे लक्ष देता आले नाही. प्रतिवादीचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणणेस वादीला योग्य व रास्त कारण घडलेले आहे. सदरचे वारस रेकॉर्डवरती न आलेस व अबेटमेंटचा हुकुम रद्द न झाल्यास वादीचे कशातही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.  सबब अबेटमेंटचा हुकुम रद्द होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रास्ताविक प्रतिवादी क्र ८ च्या वारसांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असुन त्यात त्यांनी सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन तो त्यांना मान्य व कबुल नाही. वादी यांनी जाणुनबुजुन प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेतले नाही. त्यामुळे सदरचा दावा त्यांच्याविरुद्ध अबेट झाला आहे. सबब अर्ज  नामंजुर करावा असे सांगितले आहे. अर्ज मंजुर करावा असे न्यायालय निर्णयावर आलेस कॉस्ट करुन अर्ज मंजुर करणेत यावा करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा  हद्द निश्चित व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीने मयत प्रतिवादी आनंदा यशवंत मोहिते याचा मृत्युचा उतारा **(नि.६१)** दाखल केला असुन त्यावरुन तो दि. ०१.०७.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास वादीस साधारणतः ५७ दिवसांचा उशिर झालेला आहे. असे असले तरी दाव्याच्या निर्णयाकरीता सदर अबेटमेंटचा हुकुम रद्द करणे न्यायोचित राहिल. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज **(नि.५५)** मंजूर करणेत येतो.

२. वादीने नि. ५३ वरील खर्चाची रक्कम प्रास्ताविक प्रतिवादी क्र ८ च्या वारसांना अदा केल्यानंतर अबेटमेंटचा आदेश रद्द होईल.

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2025.04.07 16:04:04 +0530

स्थळ : कराड ( पी.जी.शेलार )

दिनांक :– ०७.०४.२०२५ ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.